CMYK

भुमराळा - किनगाव मार्गावर खड्ड्यांचे साम्राज्य >> पान 2

देवळालीत भारतीय लष्कराच्या तोफखान्यातील विविध शस्त्रांच्या भव्य प्रदर्शनाचे आयोजन >> पान 3

देश आणि समाज सक्षम करण्यासाठी शिक्षणाची भुमिका महत्वाची : केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव >> पान 4

**सुविचार**

बुद्धिमत्ता म्हणजे माहितीचे योग्य वापर करणे.


# दैनिक आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 161 ■ बुधवार, दि. 22 जानेवारी 2025 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006




'छावा' चित्रपटातील रश्मिकाचा पहिला लूक प्रदर्शित, महाराणी येसूबाईची भूमिका साकारणार

आतील पान

## महाराष्ट्राच्या विकासाला मोठा बुस्ट : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

### दावोसमध्ये पहिल्याच दिवशी ४,९९,३२१ कोटींचे सामंजस्य करार

- पहिला करार राज्यातील पहिला जिल्हा गडचिरोलीसाठी
- बाहर बर्फ, लेकिन अंदर गरमी है, असे का म्हणाले सज्जन जिंदाल?
- नागपूर, गडचिरोलीसाठी जेएसडब्ल्यूशी ३ लाख कोटींचा सामंजस्य करार
- ९२,२३५ रोजगार निर्मिती



**दावोस : दावोसमध्ये वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमचे काल रात्री उद्घाटन झाल्यानंतर आज पहिल्याच दिवशी महाराष्ट्राने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्त्वात विक्रमी ४ लाख ९९ हजार ३२१ कोटींच्या गुंतवणुकीचे सामंजस्य करार केले आहेत. यातून सुमारे ९२,२३५ इतकी रोजगारनिर्मिती होणार आहे. यातील एकच करार ३ लाख कोटींचा असून हा जेएसडब्ल्यू यांच्यासोबत करण्यात आला असून, तो स्टील, नवीनीकरणीय ऊर्जा, पायाभूत सुविधा, सिमेंट, लिथियम-आयर्न बॅटरिज, सोलर वेफर आणि सेल मॉड्युल्स इत्यादी क्षेत्रात करण्यात आला आहे. महाराष्ट्राच्या विकासाला मोठा बुस्ट देणारा हा करार असल्याची भावना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त करीत याबद्दल जेएसडब्ल्यूचे सज्जन जिंदाल यांचे आभार मानले आहेत. उद्योगमंत्री उदय सामंत आणि अधिकारी यावेळी उपस्थित होते.**

### फ्युएलची पुण्यात संस्था

यातील एक करार फ्युएल अर्थात फ्रेंडस युनियन फॉर एनर्जायझिंग लाईव्हज यांच्याशी करण्यात आला असून, ते महाराष्ट्रातील ५००० युवकांना आर्टिफिशियल इंटिलिजन्स, डिजिटल मार्केटिंग आणि बिझनेस ॲनालिटिक्स या क्षेत्रात प्रशिक्षित करणार आहेत. फ्युएल स्किलटेक युनिव्हर्सिटी पुण्यात स्थापन करण्याचा मनोदय सुद्धा त्यांनी व्यक्त केला आहे.

आजचा दिवस महाराष्ट्रासाठी ऐतिहासिक दिवस आहे. दावोसमध्ये बाहेर बर्फ पडतो आहे. पण, येथे आतमध्ये गुंतवणुकीचा ओघ येत असल्याने गर्मी आहे, असे सांगताना ते म्हणाले, महाराष्ट्रात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्त्वात 'ईज ऑफ डुईंग बिझनेस'ची प्रक्रिया अतिशय वेगवान आणि तितकीच सहजसोपी प्रक्रिया आहे. गुंतवणूकदारांच्या बाहेर मोठ्या रांगा लागल्या आहेत. महाराष्ट्रात एकदा याल तर पुन्हा तुम्ही बाहेर जाणार नाही, असे मी त्यांना सांगितल्याचे सज्जन जिंदाल यांनी यावेळी सांगितले.

दरम्यान, आज दावोसमध्ये पहिला करार हा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणतात, त्याप्रमाणे राज्यातील शेवटच्या नाही, तर पहिला जिल्हा असलेल्या गडचिरोलीसाठी झाला. कल्याणी समूहासोबत संरक्षण, स्टील, ईव्ही क्षेत्रासाठी हा करार झाला. यात गुंतवणूक ५२०० कोटी रुपयांची असून ४००० रोजगार निर्मिती होणार आहे. आज झालेले सामंजस्य करार हे कल्याणी समूह, रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर, बालासोर अलॉय लि., विराज प्रोफाईल्स प्रा. लि., एबी इनबेव, जेएसडब्ल्यू, वारी एनर्जी, टेम्बो, एलमॉंट, ब्लॅकस्टोन आणि पंचशील रियालिटी, अवनी पॉवर बॅटरिज, जेन्सॉल, बिसलरी इंटरनॅशनल, एच टू पॉवर, झेड आर टू, ब्ल्यू एनर्जी मोटर्स, इस्सार, बुक माय शो, वेल्स्पून इत्यादी कंपन्यांचा समावेश असून, लॉजिस्टिक, ऑटोमोबाईल्स, स्टील, इलेक्ट्रॉनिक्स, आयटी, पायाभूत सुविधा, करमणूक, हरित ऊर्जा, ग्रीन हायड्रोजन आदी क्षेत्रातील हे करार आहेत.

## जमीन खरेदी-विक्रीबाबत सर्वोच्च न्यायालयाचा मोठा निर्णय! मालमत्तेचा ताबा घेतला तरी जागेची मालकी मिळणार नाही

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** विक्री करार नोंदणीकृत असल्याशिवाय कोणत्याही स्थावर मालमत्तेची मालकी हस्तांतरित केली जात नाही. केवळ मालमत्तेचा ताबा घेणे किंवा हस्तांतरित करणे आणि पैसे देणे यामुळे मालमत्तेची मालकी हस्तांतरित होत नाही. असं सर्वोच्च न्यायालयाने म्हंटले आहे. मालमत्ता आता फक्त नोंदणीकृत कागदपत्रांद्वारे हस्तांतरित केली जाणार आहे.

गेल्या महिन्यात दिलेल्या निकालात, न्यायमूर्ती बी.व्ही. नागरत्ना यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठाने म्हटले आहे की, मालमत्ता हस्तांतरण कायदा, १८८२ च्या कलम ५४ च्या तरतुदीनुसार, मालमत्ता केवळ नोंदणीकृत कागदपत्राद्वारे हस्तांतरित केली जाऊ शकते. १०० रुपये किंवा त्याहून अधिक किमतीच्या स्थावर मालमत्तेची विक्री नोंदणीकृत कागदपत्राद्वारे केली गेली तरच ती वैध मानली जाणार आहे.

जाहिरात

सर्वोच्च न्यायालयाने लिलाव खरेदीदाराच्या बाजूने ही बाब मांडताच दुसऱ्याने आक्षेप घेतला होता. आणि मालमत्तेच्या काही भागावर ताबा असल्याचा दावा केला होता परंतु तो दावा नोंदणीकृत नसलेल्या 'विक्री करार' आणि सामान्य मुखत्यारपत्रावर आधारित होता. न्यायालयाने आक्षेप रद्द केला. बऱ्याच वेळा लोक प्रॉपर्टी डीलर किंवा मध्यस्थांमार्फत पॉवर ऑफ ॲटर्नी आणि मृत्युपत्राद्वारे मालमत्ता खरेदी करतात. अशा प्रकरणांमध्ये सर्वोच्च न्यायालयाचा हा निर्णय एक आदर्श ठरणार आहे.

दरम्यान, मुख्य निवडणूक आयुक्त आणि निवडणूक आयुक्तांच्या नियुक्तीसाठी कायद्याला आव्हान देणाऱ्या याचिकेवर सर्वोच्च न्यायालयात सुनावणी पार पडली आहे. दरम्यान, न्यायालयाने म्हटले आहे की हे प्रकरण न्यायालयाच्या मताशी विरुद्ध कायदेमंडळाच्या कायदे करण्याच्या अधिकाराशी संबंधित आहे. न्यायमूर्ती सूर्यकांत यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठाने या प्रकरणाच्या पुढील सुनावणीसाठी ४ फेब्रुवारी ही तारीख निश्चित करताना म्हटले आहे की कोणाचे मत सर्वोच्च आहे ते पाहिले जाईल.

## नवाब मलिक यांच्या अडचणीत वाढ होण्याची शक्यता

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्याचे माजी मंत्री राष्ट्रवादी कॉंग्रेसचे नेते नवाब मलिक यांच्या अडचणीत वाढ होण्याची शक्यता आहे. मुंबईतील न्यायालयानं नवाब मलिक यांच्या विरोधातील तक्रारीवर पोलीस चौकशी करण्याचे तसंच अहवाल सादर करण्याचे आदेश दिले आहेत. केंद्रीय महसूल खात्यातील अधिकारी आणि एनसीबीचे माजी संचालक समीर वानखेडे यांच्या बहिणीने नवाब मलिक यांच्या विरोधात तक्रार दाखल केली आहे.

वांद्रे येथील अतिरिक्त मुख्य न्याय दंडाधिकारी आशिष आवारी यांच्या न्यायालयानं या तक्रारीची दखल घेतली आहे. समीर वानखेडे यांची बहीण यास्मिन वानखेडे यांनी नवाब मलिक यांच्या विरोधात तक्रार केली. त्यावर ही कारवाही झाली आहे. नवाब मलिक यांनी आपल्या विरोधात अनेक मुलाखतींमध्ये, ट्वीट करून खोटे, निंदनीय तसंच बदनामीकारक आरोप केल्याची तक्रार यास्मिन वानखेडे यांनी केली आहे.

वानखेडे कुटुंबीयांवर दबाव टाकण्यासाठी नवाब मलिक यांनी विविध आरोप केले, अशी तक्रार यास्मिन वानखेडे यांनी दाखल केली आहे. या तक्रारीची दखल घेत वांद्रे येथील अतिरिक्त मुख्य न्याय दंडाधिकारी आशिष आभारी यांनी फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २०२ अन्वये पोलिसांना चौकशीचे आदेश दिले आहेत.

पोलिसांनी याप्रकरणी महिन्याभरात तपास करून चौकशी अहवाल १५ फेब्रुवारी रोजी सादर करावा, असे आदेश न्यायदंडाधिकाऱ्यांनी दिले आहेत. त्यामुळे नवाब मलिक यांच्या अडचणीत आणखी वाढ होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. राष्ट्रवादी कॉंग्रेसचे ज्येष्ठ नेते तसंच राज्याचे माजी मंत्री असलेले नवाब मलिक सध्या जामीनावर बाहेर आहेत. नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत नवाब मलिक शिवाजीनगर मानखुर्द मतदारसंघातून निवडणुकीच्या रिंगणात उभे होते. परंतु, त्यांचा समाजवादी पक्षाच्या अबू आझमी यांनी पराभव केला. तर, नवाब मलिक यांची कन्या सना मलिक अणुशक्तीनगर मतदारसंघातून विजयी होऊन आमदार झाल्या आहेत. न्यायालयासमोर सादर होणाऱ्या चौकशी अहवालामध्ये पुढे काय होते, याकडे सर्वांचं लक्ष आहे.

## मुंबईत धक्कादायक घटना, भांडुपच्या ड्रीम्स मॉलच्या बेसमेंटमध्ये साचलेल्या पाण्यात महिलेचा मृतदेह तरंगताना दिसला

**मुंबई/प्रतिनिधी :** मुंबई उपनगरातील भांडुप परिसरात असणाऱ्या ड्रीम्स मॉलमध्ये एका महिलेचा मृतदेह आढळून आला आहे. ड्रीम्स मॉलच्या बेसमेंटमध्ये मोठ्याप्रमाणावर पाणी साचले आहे. या साचलेल्या पाण्यात मंगळवारी सकाळी १० वाजण्याच्या सुमारास एका महिलेचा मृतदेह तरंगताना दिसून आला. या महिलेच्या अंगावर गुलाबी रंगाचा ड्रेस आणि पांढरी ओढणी होती. या महिलेची ओळख अद्याप पटलेली नाही. मात्र, ड्रीम्स मॉलमध्ये मृतदेह आढळून आल्याने एकच खळबळ उडाली आहे. याबाबत माहिती मिळाल्यानंतर पोलीस घटनास्थळी दाखल झाले आहेत. प्राथमिक माहितीनुसार, भांडुप पोलीस स्टेशन अंतर्गत ड्रीम्स मॉल बेसमेंट या ठिकाणी पाण्यात एक अनोळखी महिला वय वर्ष ३० ते ३५ हिचा ०९.४० चे सुमारास मृतदेह मिळून आला आहे.

## कोल्हापुरच्या जोतिबा डोंगरावरील प्रसादात आढळलं ब्लेडचं पान

**कोल्हापूर/प्रतिनिधी :** देवस्थानच्या ठिकाणी आपण खात असणारा प्रसाद सुरक्षित आहे का? असा प्रश्न उपस्थित होत आहे. कारण कोल्हापूर जिल्ह्यातील जोतिबा डोंगरावरील प्रसादाच्या कुंड्यात चक्क ब्लेडच तुटलेलं पान आठळून आलं आहे. त्यामुळे देवस्थानच्या ठिकाणी मिळत असणारा प्रसाद नक्की सुरक्षित आहे का असा प्रश्न उपस्थित होतोय. यापूर्वी देखील जोतिबा मंदिर परिसरात तब्बल दोन टन भेसळयुक्त खवा आणि पेढा आढळून आला होता, या संदर्भात अन्न आणि औषध प्रशासनाने कारवाई केली, पण त्याचे पुढे काय झालं याबाबत मात्र अन्न आणि औषध प्रशासनाने कोणतीच माहिती दिली नसल्याच तक्रारदाराने म्हटले आहे.

कोल्हापूरच्या जोतिबा डोंगरावरील प्रसादात आढळलेलं ब्लेडचं पान हे जोतिबा डोंगरावरील शिवाजी पुतळा परिसरातल्या मिठाई दुकानातून घेतलेल्या प्रसादा मध्ये आढळलं आहे. संबंधित दुकानदारासह अन्न औषध प्रशासनाच्या अधिकाऱ्यांवर देखील कारवाईची मागणी माजी ग्रामपंचायत सदस्य सुनील नवाळे यांनी केली आहे. प्रसादात ब्लेड आढळल्याने भाविकांमध्ये घाबराहटीचे वातावरण निर्माण झालं आहे.

चार दिवस ज्योतिबा मंदिर बंद :

कोल्हापूर जिल्ह्यातील श्री क्षेत्र जोतिबाच्या मूर्तीची उद्यापासून संवर्धन प्रक्रिया सुरू होणार. २१ ते २४ जानेवारी दरम्यान चार दिवस ही संवर्धन प्रकिया चालणार आहे. जोतिबाच्या मूळ मूर्तीचे जतन करण्यासाठी पुरातत्व विभागाच्या वतीने ही प्रक्रिया राबवली जाणार आहे. जोतिबाची मुख्य मूर्ती प्राचीन दगडापासून बनलेली आहे. या मूर्तीवर वर्षानुवर्ष होत असलेल्या अभिषेकामुळे मूर्तीची झीज झाली आहे, त्यामुळे पश्चिम महाराष्ट्र देवस्थान समितीच्या वतीने राज्य आणि केंद्रीय पुरातत्व विभागाला संपर्क करून मूर्तीची पाहणी करण्याची विनंती केली होती. या पाहणीनंतर पुरातत्व विभागाने मूर्तीच्या संवर्धनाची प्रक्रिया गरजेचे असल्याचे नमूद केला होत, त्यानुसार उद्यापासून ही संवर्धन प्रक्रिया सुरू होणार आहे, यादरम्यान भक्तांसाठी जोतिबाची उत्सव मूर्ती मंदिरातील कासव चौकात ठेवली जाणार आहे.

## पुण्यात नवीन विषाणूचा शिरकाव, २२ संशयित आढळले, काय आहे नवीन आजार?

दैनिक आपला विदर्भ

**पुणे/प्रतिनिधी :** पुणेकरांची धाकधुक वाढणारी एक बातमी समोर आली आहे. पुण्यात एका नवीन विषाणूचा शिरकाव झाला आहे. गुईलेन बॅरे सिंड्रोम असे या विषाणूचे नाव आहे. या विषाणूच्या साधारण २२ संशयित रुग्णांची नोद झाल्याची माहिती पुणे महापालिकेने दिली आहे. या घटनेनंतर संशयित रूग्णांचे नमुने आयसीएमआर एनआयव्हीकडे तपासणीसाठी पाठवण्यात आले आहे.या तपासणीअंती या आजाराचा निष्कर्श निघणार आहे. तत्पुर्वी हा नवीन आजार काय आहे? या आजाराचा नेमका कुणाला धोका आहे?

पुण्यात गुईवेल सिंड्रोमचे २२ संशयित रुग्णांपैकी ६ रूग्ण हे पुणे शहरात तर बाकी रुग्ण हे जिल्ह्यातील आहेत. हे रुग्ण उपचारासाठी पुण्यात आलेले होते. या रुग्णांची तपासणी केली जात आहे. हा आजार संसर्गजन्य नाही. तसेच ज्या हॉस्पिटलमध्ये ॲडमिट होते त्या परिसरातही रुग्णांची तपासणी केली जाणार अशी माहिती आरोग्य प्रमुख नीना बोराडे यांनी दिली आहे.

गुइलेन बॅरे सिंड्रोम हा एक दुर्मिळ न्यूरोलॉजिकल डिसऑर्डर आहे ज्यामध्ये शरीराची रोगप्रतिकारक शक्ती मज्जातंतूवर हल्ला करते. या स्थितीचा परिणाम स्नायुंमधील कमकुवतपणा, पक्षाघात आणि गंभीर प्रकरणांमध्ये जीवघेणी गुंतागुंत होऊ शकते. दुर्मिळ असा गुइलेन बॅरे सिंड्रोम हा कोणत्याही व्यक्तीला प्रभावित करू शकतो.

जीबीएस या आजाराचे पहिले लक्षण म्हणजे अशक्तपणा आणि हातपाय मुंग्या येणे. या आजाराचे कारण सध्या माहीत नाही. गुइलेन बॅरे सिंड्रोमची कारणे पूर्णपणे समजून घेणे वैद्यकीय शास्त्रासाठी अजूनही एक आव्हान आहे. पण गुइलेन बॅरे सिंड्रोमला ऑटोइम्यून डिसऑर्डर म्हणतात. गुइलेन बॅरे सिंड्रोम दोन तृतीयांश रुग्णांमध्ये शस्त्रक्रिया किंवा लसीकरणानंतर सात दिवस ते पाच आठवड्यानंतर दिसून आले आहे. त्याचवेळी काही लोकांमध्ये हे संक्रमण ट्रिगरसारखे कार्य करते.

ही आहेत लक्षणे

अंग दुखणे

चालताना तोल जाणे

चेहरा सूजने

चालताना व गिळताना त्रास होणे

हात-पाय लूळ पडणे

उपचाराने टळेल धोका

जीबीएस किंवा एआयडीपी या आजारावर आयव्हीआयजी हे इंजेक्शन देणे महत्त्वाचे आहे. हे इंजेक्शन महागडे असून तीन दिवसांच्या आत दिल्यास रुग्णांवरील धोका टळतो. मात्र, हे उपचार तज्ज्ञ डॉक्टरांच्या निगराणीमध्येच हिताचे ठरते, असे तज्ज्ञांचे मत आहे.

## न्या. आलोक आराधे यांनी घेतली मुख्य न्यायमूर्ती पदाची शपथ

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** तेलंगणा उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती न्या.आलोक आराधे यांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायमूर्ती पदाची शपथ घेतली.

राजभवन येथे मंगळवारी (दि. २१) झालेल्या एका छोटेखानी शपथविधी समारंभामध्ये राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी न्या. आलोक आराधे यांना पदाची शपथ दिली. शपथ दिल्यानंतर राज्यपालांनी व त्यांच्यानंतर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी न्या. आराधे यांचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले.

शपथविधी सोहळ्याला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर, कौशल्य विकास मंत्री मंगल प्रभात लोढा तसेच मुंबई उच्च न्यायालयातील न्यायाधीश उपस्थित होते.

राज्याच्या मुख्य सचिव सुजाता सौनिक यांनी न्या. आलोक आराधे यांच्या नियुक्तीबाबत केंद्र सरकारची अधिसूचना वाचून दाखवली. शपथविधी सोहळ्याची सुरुवात राष्ट्रगीत व राज्यगीताने झाली आणि राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

न्या. आलोक आराधे यांचा जीवन परिचय

न्या. आलोक अराधे यांचा जन्म १३ एप्रिल १९६४ रोजी रायपूर, छत्तीसगड येथे झाला. त्यांनी १२ जुलै १९८८ रोजी वकील म्हणून नोंदणी केली. मध्य प्रदेश उच्च





न्यायालयाच्या जबलपूर खंडपीठात त्यांनी नागरी आणि घटनात्मक प्रकरणांवर काम केले. एप्रिल २००७ मध्ये त्यांची वरिष्ठ वकील म्हणून नियुक्ती झाली. २९ डिसेंबर २००९ रोजी मध्य प्रदेश उच्च न्यायालयाचे अतिरिक्त न्यायाधीश व १५ फेब्रुवारी २०११ रोजी ते कायमस्वरूपी न्यायाधीश झाले. न्या. आराधे २० सप्टेंबर २०१६ रोजी जम्मू-काश्मीर उच्च न्यायालयाचे न्यायाधीश झाले आणि ११ मे २०१८ रोजी हंगामी मुख्य न्यायमूर्ती झाले. १७ नोव्हेंबर २०१८ रोजी त्यांची कर्नाटक उच्च न्यायालयात न्यायाधीश म्हणून नियुक्ती. ३ जुलै २०२२ ते १४ ऑक्टोबर २०२२ त्यांनी कर्नाटक उच्च न्यायालयात हंगामी मुख्य न्यायमूर्ती म्हणून काम पहिले. दिनांक १९ जुलै २०२३ रोजी त्यांची तेलंगाणा उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायमूर्ती पदावर नियुक्ती करण्यात आली.

न्या. आलोक अराधे यांनी मध्यस्थी व सामंजस्य केंद्रे, न्यायिक अकादमी, तसेच कायदेशीर सेवा प्राधिकरणांमध्ये नेतृत्व केले आहे. त्यांच्या कारकीर्दीत त्यांनी न्यायव्यवस्थेच्या विविध अंगांवर उल्लेखनीय कामगिरी केली आहे.

CMYK

## थोर क्रांतिकारक नेते आझाद हिंद सेनेचे सरसेनापती नेताजी सुभाषचंद्र बोस

स्वातंत्र्य चळवळीतील थोर क्रांतिकारक नेते आझाद हिंद सेनेचे सरसेनापती सुभाषचंद्र बोस यांची २३ जानेवारी रोजी १२८ वि जयंती. २३ जानेवारी १८८७ रोजी कटक येथे नेताजींचा जन्म झाला. नेताजींना आठ भावंडे होती. नेताजी लहानपणापासूनच बंडखोर प्रवृत्तीचे होते. वयाच्या १५ वर्षीच नेताजींनी हिमालयाच्या दिशेने प्रस्थान केले. पण त्यांना गुरू दर्शन झाले नाही म्हणून त्यांनी स्वामी विवेकानंद यांचे साहित्य वाचून त्यांना गुरू बनवले. कॉलेजमध्ये असताना एका इंग्रज शिक्षकाने भारतीयांना दूषणे दिली तेंव्हा नेताजींनी उभे राहून त्या शिक्षकाला जाब विचारीत निषेध नोंदवला. इतकेच नाही तर त्या शिक्षकावर कारवाई व्हावी यासाठी कॉलेजमध्ये बंद पुकारला याचा राग मनात धरून कॉलेज प्रशासनाने त्यांना कॉलेजमधून काढून टाकले. १९२१ साली इंग्लंडला जाऊन नेताजींनी इंडियन सिव्हिल सर्व्हिसची परीक्षा दिली त्यात ते चौथ्या क्रमांकाने उत्तीर्ण झाले. नेताजींनी काहीकाळ सिव्हिल सर्व्हीसमध्ये नोकरी देखील केली. पण भारत मातेला इंग्रजांच्या गुलामगिरीतून मुक्त करण्यासाठी त्यांनी सिव्हिल सर्व्हिसच्या नोकरीवर पाणी सोडले. तेंव्हा गांधीजींची असहकार चळवळ जोरात सुरू होती. असहकार चळवळ समजून घेण्यासाठी व स्वातंत्र्य चळवळीची पुढील दिशा ठरवण्यासाठी त्यांनी गांधीजींची भेट घेतली. महात्मा गांधींनी त्यांना चित्तरंजन दास यांच्याकडे पाठवले. चित्तरंजन दास हे त्यांचे राजकीय गुरू बनले. इंग्लंडची राणी कोलकोत्याच्या दौऱ्यावर येणार आहे हे समजल्यावर नेताजींनी या दौऱ्यावर बहिष्कार टाकण्याची योजना आखली. इंग्रजांना त्याची कुणकुण लागताच त्यांनी नेताजी आणि चित्तरंजन दास यांना अटक केली. सहा महिने त्यांना तुरुंगवास भोगावा लागला. तुरुंगात असताना त्यांनी इतिहास, धर्मशास्त्र आणि मानसशास्त्र या विषयांचे वाचन केले. तुरुंगातून मुक्त झाल्यावर त्यांनी भारतातील राजकीय परिस्थितीचा अभ्यास केला आणि ते राजकारणात सक्रिय झाले. ते बंगाल प्रांतिक काँग्रेसचे अध्यक्ष बनले. पुढे त्यांनी इंडिया इंडिपेंडन्स युथ लीगची स्थापना करुन तरुणांना संघटित केले. १९३० च्या सविनय कायदेभंगाच्या आंदोलनात नेताजींना पुन्हा अटक झाली. गांधी आयर्विन करारानंतर त्यांची मुक्तता झाली. ते कोलकोत्याचे महापौर बनले. गांधी आयर्विन कराराला नेताजींनी विरोध केला त्यामुळे त्यांचे महात्मा गांधीशी मतभेद झाले. १९३२ साली सशस्त्र क्रांतिकारी संघटनेशी संबंध जोडून त्यांना अटक करण्यात आली. पण प्रकृतीच्या कारणावरून त्यांना तुरुंगात न ठेवता देशातून हद्दपार करण्यात आले. तीन वर्ष ते व्हिएन्ना येथे राहिले. तिथे त्यांनी युरोपातील राजकीय परिस्थितीचा अभ्यास केला. १९३७ साली गांधीजींच्या विरोधाला न जुमानता त्यांनी त्रिपुरा काँग्रेस अधिवेशनात अध्यक्षपदाची निवडणूक लढवली. अध्यक्षपदाच्या निवडणुकीत त्यांनी पट्टाभीसीतारामय्या यांचा पराभव केला. या निवडणुकीमुळे महात्मा गांधी नाराज झाले. हा आपलाच पराभव आहे असे ते मानू लागले. बहुसंख्य काँग्रेसजनांनी गांधीजींचेच नेतृत्व मान्य केले. त्यामुळे नेताजींनी अध्यक्षपदाचा राजीनामा देऊन फॉरवर्ड ब्लॉक या पक्षाची स्थापना केली. नागपूर अधिवेशनात अस्थायी राष्ट्रीय सरकार स्थापन करण्याची मागणी करण्यात आली. पण संकल्पित सत्यागृहापूर्वीच त्यांना अटक करण्यात आली. अटक केल्यानंतर नेताजींनी अन्नत्याग करु अशी धमकी दिली. या धमकीला घाबरून इंग्रजांनी त्यांना तुरुंगात न ठेवता त्यांच्या घरीच नजरकैदेत ठेवले. नजरकैदेत असतानाच त्यांनी वेषांतर करुन पेशावर गाठले तेथून ते जर्मनीला गेले. जर्मनीत त्यांनी भारतीयांना इंग्रजांविरुद्ध लढण्यास प्रवृत्त केले. त्यांनी तेथील भारतीयांना संघटित केले. जर्मनीमध्ये ते एडॉल्फ हिटलरला भेटले. बर्लिनमध्ये त्यांनी आझाद हिंद रेडिओ व फ्री इंडिया सेंटरची स्थापना केली. १९४३ ला नेताजींना जपानवरून आमंत्रण आले. जर्मनीहून जपान व्हाया मादागास्कर असा सबमरीन प्रवास करीत ते जपानला पोहचले. २१ ऑक्टोबर १९४३ रोजी त्यांनी सिंगापूर येथे आझाद हिंद सरकारची स्थापना केली. नेताजी स्वतः राष्ट्रप्रमुख, पंतप्रधान, संरक्षण मंत्री व सरसेनापती बनले. या राष्ट्राला जपान, जर्मनी, ब्रह्मदेश, इटली यासह ११ देशांनी मान्यता दिली. नेताजींनी तरुणांना आझाद हिंद सेनेत सहभागी होण्याचे आव्हान करीत तुम मुझे खून दो... मै तुम्हे आझादी दुंगा...अशी घोषणा केली. त्यांनी केलेल्या आवाहनाला प्रतिसाद देत हजारो तरुण आझाद हिंद सेनेत सामील झाले. दुसऱ्या महायुद्धाच्या काळात आझाद हिंद सेनेने जपानी लष्कराच्या साहाय्याने भारतावर आक्रमण केले. दोन्ही फौजांनी इंग्रजांकडून अंदमान निकोबार बेटे जिंकली. ब्रह्मदेशमधून आझाद हिंद सेनेच्या फौजा भारताकडे निघाल्या मात्र नैसर्गिक आपत्तीमुळे आझाद हिंद सेनेला माघार घ्यावी लागली. रंगून आकाशवाणी वरुन नेताजींनी भाषण करुन इंग्रजांशी कोणत्याही प्रकारचा समजोता न करण्याचे, फाळणी न करण्याचे लढा चालूच ठेवण्याचे आव्हान केले. महायुद्धात जर्मनी, इटली यांचा पराभव झाला. जपानने शरणागती पत्करली तेंव्हा नेताजींनी रशियाला जाण्याचा निर्णय घेतला. १८ ऑगस्ट १९४५ रोजी नेताजी विमानातून माणचुरीयाच्या दिशेने जात होते. प्रवासादरम्यान त्यांचे विमान बेपत्ता झाले. २३ ऑगस्ट १९४५ रोजी जपानच्या दोनयी वृत्तसंस्थेने जगाला कळवले की १८ ऑगस्ट रोजी नेताजींच्या विमानाला अपघात झाला त्यात नेताजींचे निधन झाले. १९९२ साली भारत सरकारने नेताजींना मरणोत्तर भारतरत्न हा सर्वोच्च पुरस्कार देण्याची घोषणा केली पण मृत्यूबाबत कोणताही पुरावा उपलब्ध नसल्याने त्यांना मरणोत्तर भारतरत्न पुरस्कार देणे अवैध आहे असे म्हणत त्यांच्या कुटुंबीयांनी हा पुरस्कार नाकारला. तुम मुझे खून दो... मै तुम्हे आझादी दुंगा... असा नारा देत भारतीयांमध्ये स्वातंत्र्य लढ्याची चेतना निर्माण करणाऱ्या नेताजींना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!

# भुमराळा - किनगाव मार्गावर खड्ड्यांचे साम्राज्य

**दैनिक आपला विदर्भ**

■ देवानंद सानप

### ग्रामस्थ शेतकरी विद्यार्थ्यांचे हाल सुरुच

### विद्यमान आमदारांकडून वाढल्या अपेक्षा

**बिबी :** सिंदखेडराजा मतदार संघातील शेवटच्या टोकावर असलेल्या व लोणार तालुक्यातील भुमराळा ते किनगाव जटटू या मुख्य भागातील रस्त्यांची अत्यंत दुरवस्था झाली आहे गेल्या तीन वर्षांपासून भुमराळा किनगाव जटटू मार्गावर खड्ड्याचे साम्राज्य निर्माण झाले आहे त्यामुळे ग्रामस्थांच्या नशिबी अजूनही भोग सुरुच आहे या मार्गावर ये जा करणारे वाहन चालक,शेतकरी, विद्यार्थी, अक्षरशा त्रस्त झाले आहे आज घडीला हा मार्ग विद्यार्थ्यांसाठी व वाहनधारकांसाठी जीवघेणा ठरत आहे

भुमराळा येथुन हा मार्ग मुख्य मार्ग व जागतिक लोणार सरोवर ते संभाजीनगर मार्गाला जोडल्या गेला असुन या मार्गाने गावकरी, शेतकरी, शेतमजूर, विद्यार्थांची मोठी वर्दळ असते परंतु मार्गावर जागोजागी मोठ मोठे खड्डे पडले असून गिट्टी उघडली असल्याने मार्गाची अवस्था अत्यंत बिकट झाली आहे रात्री खड्डे चुकवण्याच्या नादात वाहनधारकांचे अनेक अपघात होत आहेत वाहने चालवताना वाहनधारकांना तारेवरची कसरत करावी लागते अशा दुरवस्था झालेल्या मार्गाकडे माजी लोकप्रतिनिधींनी सतत दुर्लक्ष केले असून विद्यमान लोकप्रतिनिधींकडुन वाहनधारकांच्या अपेक्षा वाढल्या असुन संबंधित विभागातील अधिकारी व लोकप्रतिनिधी भुमराळा ते किनगाव जटटू रस्त्याच्या समस्येकडे गांभीर्याने लक्ष द्यावे शासनाने निधीची तरतूद करून डांबरीकरणाचे काम पूर्ण करून द्यावे अशी मागणी वाहनधारक, विद्यार्थी, शेतकरी, शेतमजूरांकडून होत आहे.





**भुमराळा गावानजीक एक किलोमीटर पर्यंत घाट रस्ता असुन त्या घाटातील डांबरीकरण पुर्णपणे उखडून गेले आहे त्यामुळे अनेक मालवाहू गाड्या, मोटारसायकल, एसटी बस, रुग्णवाहिका सह सर्वच वाहनधारकांना या घाटातून वाहने चालवितांना तारेवरची कसरत करावी लागते आहे अनेक वेळा या घाटात अपघात सुद्धा झाले असून याबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाचे देऊळगाव राजा येथील इंजिनिअर यांना याबाबत माहिती दिली असून मतदार संघाचे आमदार मनोज कायंदे यांना भेटून सर्व समस्या मांडणार असुन आमदार आमच्या समस्या सोडवतील असा विश्वास भाजपा युवा मोर्चाचे जिल्हा उपाध्यक्ष देवानंद सानप यांनी व्यक्त केला.**

# भारतीय राज्यघटनेमुळेच भारताची जागतिक स्तरावर शक्तिशाली राष्ट्र म्हणून ओळख - सभापती प्रा.राम शिंदे

## पाटणा पीठासीन अधिकारी परिषदेत विचारमंथन

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** जागतिक स्तरावर भारताने एक शक्तिशाली राष्ट्र म्हणून ओळख प्राप्त केली आहे. आपल्या राज्यघटनेने त्यादृष्टीने भक्कम आधारशिला प्राप्त करून दिली असल्यानेच हे शक्य झाले. लोकशाही संस्था बळकट करणे, सकारात्मक सहभाग नोंदवून संसद आणि राज्य विधानमंडळे यांचे वैभव टिकवणे आणि त्यायोगे लोक कल्याणाच्या प्रति प्रतिबद्धता सुनिश्र्चित करणे, कर्तव्य आपण चोखपणे बजावले पाहिजे, असे प्रतिपादन महाराष्ट्र विधानपरिषदेचे सभापती प्रा.राम शिंदे यांनी केले. पाटणा येथे लोकसभा अध्यक्ष श्री. ओम बिर्ला यांच्या अध्यक्षतेखाली येथे आयोजित ८५ व्या अखिल भारतीय पीठासीन अधिकारी परिषदेत ते बोलत होते. भारतीय राज्यघटनेची ७५ वर्षे : घटनात्मक मूल्यांच्या बळकटीकरणासाठी संसद आणि राज्य विधान मंडळे यांचे



योगदान या विषयावर या परिषदेमध्ये विचारमंथन होत आहे.

विचार व्यक्त करतांना सभापती प्रा. शिंदे म्हणाले, आपली राज्यघटना पुरेशी लवचिक असून ती आणखी सामर्थ्य प्राप्त करीत आहे. आपल्या संसदीय लोकशाहीने राज्यघटनेच्या या शक्तिमुळेच संकटांचा यशस्वी सामना केला. घटना दुरुस्तीच्या संदर्भात काहींनी हेतूता गैरसमज पसरविण्याचे प्रयत्न केले, मात्र अलीकडच्या निवडणुकांमध्ये जनतेने त्यांना नाकारून योग्य जनादेश दिला आहे.

लोकशाहीत स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या तीन मूल्यांना अत्यंत महत्त्व आहे. एकाला सोडून दुसऱ्याचा विचार देखील करता येणार नाही. तसे झाल्यास लोकशाही संदर्भातील मूळ संकल्पनेलाच बाधा पोहोचेल या भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी घटना परिषदेसमोर दिलेल्या भाषणातील सावधानतेकडे सभापती प्रा. शिंदे यांनी उपस्थितांचे लक्ष वेधले आणि सर्वांनी या मूल्यांप्रती कटिबद्ध राहण्याचे आवाहन केले.

सर्वसमावेशिता आणि सर्वांना समान संधीची उपलब्धता हे आपल्या राज्यघटनेचे महत्वाचे वैशिष्ट्य त्यांनी यावेळी अधोरेखित केले. कोणतीही राजकीय, आर्थिक अशी कौटुंबिक पार्श्र्वभूमी नसलेल्या कुटुंबातून पुढे आलेले प्रधानमंत्री नरेंद्र मोदी हे आपल्या उल्लेखनीय कार्यकर्तृत्वाच्या आधारावर तिसऱ्यांदा योगदान देत देशाला विकासाच्या वाटेवर पुढे नेत आहेत. हे स्वयंस्पष्ट उदाहरणच यासंदर्भात पुरेसे आहे, असेही सभापती प्रा. राम शिंदे यावेळी म्हणाले.

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संसदीय कारकीर्दीचा प्रारंभ तेव्हाच्या बॉम्बे लेजिस्लेटिव्ह काऊन्सिल सदस्यत्वापासून झाला आहे आणि त्याचा आम्हाला अभिमान असल्याचेही त्यांनी सांगितले.

आपल्या उत्तुंग कार्यकर्तृत्वाद्वारे लोककल्याणकारी राज्याची संकल्पना प्रत्यक्षात आणणाऱ्या पुण्यश्र्लोक अहिल्यादेवी होळकर यांचेही त्यांनी यावेळी स्मरण केले.

### ‘छावा’ चित्रपटातील रश्मिकाचा पहिला लूक प्रदर्शित, महाराणी येसूबाईची भूमिका साकारणार

**मुंबई/प्रतिनिधी :** बॉलिवूडचा उत्कृष्ट अभिनेता विकी कौशल सध्या त्याच्या आगामी ’छावा’ चित्रपटामुळे चर्चेत आहे. ज्यामध्ये लोकांना त्याचा लूक खूप आवडतोय. विकीनंतर चित्रपटाच्या नायिकेचे पहिले फोटोही समोर आले आहेत. खरंतर, रश्मिका मंदान्ना या चित्रपटात विकीसोबत स्क्रीन शेअर करणार आहे. चित्रपटात अभिनेत्रीचा अतिशय शाही लूक पाहायला मिळाला. विकी कौशल चा छत्रपती संभाजी महाराज यांच्या जीवनावर आधारित ’छावा’ १४ फेब्रुवारीला येणार रसिकांच्या भेटीला

खरंतर, मॅडॉक फिल्म्सने आज म्हणजेच मंगळवारी ’छवा’ मधील रश्मिका मंदानाचा लूक शेअर करून चाहत्यांना एक मोठी मेजवानी दिली आहे. रश्मिकाचे हे फोटो शेअर करताना कॅप्शनमध्ये लिहिले आहे की, ’प्रत्येक महान राजाच्या मागे, अतुलनीय शक्ती असलेली एक राणी उभी असते. स्वराज्याचा अभिमान - रश्मिका मंदान्ना यांची महाराणी येसूबाई’

रश्मिका या चित्रपटात महाराणी यशूबाईची भूमिका साकारत आहे.

मॅडॉक फिल्म्सने त्यांच्या इंस्टाग्राम अकाउंटवर ’छावा’ चित्रपटातील महाराणी यशुबाईच्या भूमिकेत रश्मिकाचे दोन फोटो शेअर केले आहेत. त्यापैकी एका व्हिडिओमध्ये, अभिनेत्री कॅमेऱ्याकडे पाहून हसत आहे. दुसऱ्या फोटोमध्ये, रश्मिका जड दागिन्यांसह एखाद्याकडे पाहत असल्याचे दिसत आहे.

## राज्यपालांच्या उपस्थितीत नॅबचा ७४ वा स्थापना दैनंदिन साजरा

# अधिकाधिक लोकांनी नेत्रदान करण्याचा संकल्प करावा - राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** आपण स्वतः तसेच आपल्या कुटुंबातील सर्वांनी नेत्रदानाचा संकल्प केला आहे. नेत्रदानातून अनेक दृष्टिहीन व्यक्तींना नवी दृष्टी प्राप्त होऊ शकते. यास्तव अधिकाधिक लोकांनी नेत्रदानाचा संकल्प करावा असे आवाहन राज्यपाल सी पी राधाकृष्णन यांनी आज येथे केले.

नॅशनल असोसिएशन फॉर द ब्लाइंड (नॅब) या अंध व्यक्तींच्या शिक्षण, पुनर्वसन व रोजगारासाठी कार्य करणाऱ्या संस्थेचा ७४ वा स्थापना दिवस संस्थेच्या वरळी मुंबई येथील सभागृहात सोमवारी (दि. २०) संपन्न झाला, त्यावेळी राज्यपाल बोलत होते.

झारखंड येथे आपण राज्यपाल असताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या








७३ व्या वाढदिवसाला ७३ लोकांनी नेत्रदानाचा संकल्प केला होता, तर २०२४ साली महाराष्ट्रात आल्यावर पंतप्रधानांच्या वाढदिवसाला आपल्या आवाहनानुसार ७४० व्यक्तींनी नेत्रदानाचा संकल्प केला. यंदा होणाऱ्या पंतप्रधानांच्या ७५ व्या वाढदिवसाला ७५०० लोकांकडून नेत्रदानाचा संकल्प करून घेण्याचे लक्ष्य आपण ठेवले असल्याचे राज्यपालांनी सांगितले.

नॅब संस्थेच्या स्थापनेत क्रिकेटपटू विजय मर्चंट यांचे योगदान होते हे समजल्यामुळे आपला त्यांच्याप्रती असलेला आदर शतपटींनी वाढला आहे, असे सांगून नॅब ही संस्था अंध तसेच दृष्टिबाधित व्यक्तींकरिता आशा जागवणारी व सक्षमीकरणाची हमी देणारी संस्था ठरली आहे असे राज्यपालांनी सांगितले.

आपले पूर्ववर्ती राज्यपाल रमेश बैस यांनी ’नॅब’ला ब्रेल प्रिंटिंग प्रेस खरेदी करण्यास अर्थसहाय्य केले असल्याचे नमूद करून यापुढे देखील राजभवन नॅबच्या पाठीशी खंबीरपणे उभी राहील असे राज्यपालांनी सांगितले.

आपल्या ब्रेल प्रिंटिंग प्रेस, टॉकिंग बुक्स, परफ्युमरी प्रशिक्षण आणि शिक्षक प्रशिक्षण यांसारख्या उपक्रमांच्या माध्यमातून नॅब दृष्टीहीन व्यक्तींना सन्मानाने जीवन जगण्यासाठी सक्षम करीत असल्याबद्दल राज्यपालांनी संस्थेचे अभिनंदन केले.

कार्यक्रमाला नॅबचे अध्यक्ष हेमंत टकले, मानद महासचिव हरिंदर कुमार मल्लिक, कार्यकारी महासचिव डॉ विमल देंगडा, कार्यकारी संचालक पल्लवी कदम, संस्थेचे आश्रयदाते व विद्यार्थी उपस्थित होते. यावेळी राज्यपालांच्या हस्ते विविध पारितोषिके वितरण करण्यात आली.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

# देवळालीत भारतीय लष्कराच्या तोफखान्यातील विविध शस्त्रांच्या भव्य प्रदर्शनाचे आयोजन

दैनिक आपला विदर्भ

**नाशिक/प्रतिनिधी :** देवळालीच्या तोफखाना शाळेत तोपची २०२५ या वार्षिक सरावाचे आयोजन मोठ्या उत्साहात करण्यात आले. भारतीय लष्कराच्या तोफखान्याच्या प्रगत क्षमतांचा आढावा घेणारा हा सराव आधुनिक तंत्रज्ञान आणि स्वदेशी उपकरणांवर आधारित होता. यामध्ये तोफखान्याच्या विविध प्रकारच्या शस्त्रांचे आणि अग्निशक्तीचे प्रभावी प्रात्यक्षिक सादर करण्यात आले.

या कार्यक्रमाचे नेतृत्व भारतीय लष्कराचे महत्त्वाचे अधिकारी जनरल नवनीत सिंग सरना यांनी केले. लष्करातील वरिष्ठ अधिकारी, नागरी प्रशासनाचे प्रतिनिधी, तसेच नेपाळ, बेल्जियम, झेक प्रजासत्ताक यांसारख्या विविध देशांचे सैनिकी प्रतिनिधी या कार्यक्रमाला उपस्थित होते. या सरावामुळे भारतीय लष्कराच्या तोफखाना तंत्रज्ञानाची ओळख जागतिक स्तरावर झाली.





तोपची २०२५ मध्ये विविध प्रकारच्या प्रगत तोफखान्याच्या प्रणालींचे प्रदर्शन झाले. यामध्ये घ-९ वज्र, धनुष्य, णडक (अल्ट्रा लाइट होवित्झर), १५५ाा ट्रॅक्ड आणि टोड तोफ प्रणाली यांचा समावेश होता. या प्रगत तोफखान्याच्या मदतीने लष्कराच्या मारक क्षमतेत लक्षणीय वाढ झाली आहे. याशिवाय ड्रोन तंत्रज्ञान, स्वयंचलित गोळा-बारूद प्रणाली, तसेच स्मार्ट लॉजिस्टिक तंत्रज्ञानाचा वापर करून लष्कराची सज्ज्ञता अधोरेखित करण्यात आली.

या सरावात स्वयंचलित ड्रोन आणि प्रगत सेन्सर सिस्टमचा प्रभावी वापर करून शत्रूच्या ठिकाणांवर अचूक हल्ले कसे करता येतात, याचे प्रात्यक्षिक सादर करण्यात आले. यामुळे युद्धभूमीवर तंत्रज्ञानाच्या उपयोगाचे महत्त्व अधोरेखित झाले. भारतीय लष्कराच्या आत्मनिर्भरतेचे हे एक उत्तम उदाहरण ठरले.

तोपची २०२५ ने भारतीय लष्कराच्या तोफखान्याच्या प्रगत क्षमतांचा आणि त्याच्या कार्यक्षमतेचा आढावा दिला. यामुळे लष्कर कोणत्याही प्रकारच्या युद्ध किंवा आव्हानांना सामोरे जाण्यास तयार असल्याचे स्पष्ट झाले. तोफखान्याची मारक क्षमता, अचूकता, तसेच स्वयंचलित तंत्रज्ञानाच्या मदतीने भारतीय लष्कर आता अधिक प्रभावी बनले आहे. हा सराव भारतीय लष्कराच्या तोफखान्याच्या युद्धकौशल्याचा आणि नवीन उपकरणांचा प्रभावी वापर कसा करावा, याचा उत्कृष्ट नमुना ठरला.

तोपची २०२५ हा फक्त एक सराव नव्हता, तर भारतीय लष्कराच्या प्रगत क्षमतांचा आणि स्वदेशी तंत्रज्ञानावर आधारित सामर्थ्याचा ठळक पुरावा होता. यामुळे देशाच्या संरक्षण क्षेत्राला एक नवी दिशा मिळाली आहे. भारतीय लष्कराच्या आत्मनिर्भरतेचा आणि तंत्रज्ञानाधारित क्षमतेचा हा स्तुत्य उपक्रम भविष्यातही संरक्षण क्षेत्रात मोठे योगदान देईल.

## महत्त्वाचे...

### नशेसाठी औषधांची विक्री करणारे टोळी गजाआड, औषधी इंजेक्शन व गोळ्यांसह साडे चौदा लाखांचा साठा जप्त



दैनिक आपला विदर्भ

**सांगली/प्रतिनिधी :** नशेसाठी औषधांचा वापर करण्याचा धक्कादायक प्रकार सांगलीच्या मिरजेमध्ये उघडकीस आला आहे.मिरजेच्या महात्मा गांधी चौकी पोलिसांनी या प्रकरणी नशेसाठी वापरण्यात येणाऱ्या औषधी इंजेक्शन व गोळ्यांचा साठा जप्त करत नशेसाठी औषध विक्री करणाऱ्या तिघांना अटक करण्यात आली असून त्यांचाकडून साडे चौदा लाखांचा मुद्देमाल जप्त केला आहे. मिरज शहरामध्ये नशेसाठी वैद्यकीय औषधांचा अवैधरित्या वापर करण्यात येत असल्याचा प्रकार सुरू होता. या प्रकरणी महात्मा गांधी चौकी पोलिसांनी सापळा रचून नशेसाठी मेफेनटमाईन इंजेक्शन व गोळ्या विक्री करणाऱ्या टोळीचा पर्दाफाश केला आहे. टोळी कडून ६ लाख किंमतीचा १ हजार ५०७ इंजेक्शन बाटल्या व गोळ्यांचा साठा जप्त करण्यात आला आहे.

### महारेशीम अभियान रथाचे जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते उद्घाटन



**नांदेड/प्रतिनिधी :** नांदेड जिल्ह्यातील महारेशीम अभियानाची सुरुवात जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी रथाला हिरवी झेंडी दाखवून केली आहे.

सन २०२५-२६ मध्ये महारेशीम अभियान अंतर्गत तुती लागवड, मनरेगा सिल्क, समग्र दोन योजनेअंतर्गत तसेच वैयक्तिक नवीन तुती लागवड करणास उत्सुक असलेल्या शेतकऱ्यांची नोंदणी करण्यासाठी दिनांक ९ जानेवारी ते ९ फेब्रुवारी २०२५ या कालावधीत महा रेशीम अभियान जिल्ह्यात राबविण्यात येत आहे.

९ जानेवारी ते ९ फेब्रुवारी या कालावधीत हा उपक्रम राबविण्यात येणार आहे . नवीन तुती लागवड करण्यासाठी उत्सुक असलेल्या शेतकऱ्यांनी नाव नोंदणी करण्यासाठी जिल्हा रेशीम कार्यालय, रामकृष्ण इमारत, दुसरा मजला, एम एफ होंडा शोरूमच्या बाजूला, जॉन डियर सर्विस सेंटरच्या समोर, हिंगोली रोड नांदेड येथे संपर्क करावा. तसेच तालुका कृषी कार्यालय व पंचायत समिती कृषी विभाग यांच्याशी संपर्क साधून नवीन तुती लागवड करिता सभासद नोंदणी करावी, असे आवाहन रेशीम विकास अधिकारी नांदेड यांनी केले आहे. जिल्ह्यात महारेशीम अभियानाच्या रथास जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांच्या हस्ते दिनांक १५ जानेवारी रोजी हिरवी झेंडी दाखवून शुभारंभ करण्यात आला. यावेळी उपजिल्हाधिकारी संजीव मोरे, उपजिल्हाधिकारी शिंदे, रेशीम विकास अधिकारी पी. बी.नरवाडे, क्षेत्र सहाय्यक पी. यु. भंडारे, ए. एन. कुलकर्णी, एन. वाय.कोरके, ए.बी.यलकटवाड, दत्ता भुसकटे, प्रसाद डुबुकवाड उपस्थित होते.

### राष्ट्रीय स्कूल बँड स्पर्धेच्या महाअंतिम फेरीत महाराष्ट्रातील दोन शाळा; नवी दिल्लीतील मेजर ध्यानचंद नॅशनल स्टेडियममध्ये होणार महाअंतिम फेरी

नवी दिल्ली, दि. २१ : प्रजासत्ताक दिन सोहळ्याचा एक भाग म्हणून आयोजित राष्ट्रीय शालेय बँड स्पर्धा २०२४-२५ ची महाअंतिम फेरी २४ आणि २५ जानेवारी २०२५ रोजी नवी दिल्लीतील मेजर ध्यानचंद नॅशनल स्टेडियम येथे होणार आहे.

यामध्ये महाराष्ट्रातील दोन शाळा महाअंतिम फेरीत पोहोचल्या आहेत. ही स्पर्धा विद्यार्थ्यांमध्ये देशप्रेम आणि एकात्मतेची भावना जागृत करण्यासाठी आयोजित केली जाते. या स्पर्धेत १६ शाळा बँड संघ निवडले गेले आहेत. त्यात बॉयज ब्रास बँड, गर्ल्स ब्रास बँड, बॉयज पाईप बँड, गर्ल्स पाईप बँड असे असून, ४६६ मुले महाअंतिम फेरीत सहभागी होणार आहेत.

महाअंतिम फेरीसाठी महाराष्ट्रातील राजारामबापू पाटील मिलिटरी स्कूल आणि स्पोर्टस् अकॅडमी, इस्लामपूर (पश्रिचम झोन) आणि भोसला मिलिटरी स्कूल गर्ल्स, नाशिक (पश्रिचम झोन) या दोन शाळांची निवड झाली आहे.

सशस्त्र दलांचे वरिष्ठ अधिकारी परिक्षक असून हे परिक्षक मंडळ स्पर्धतील बँड चमुच्या कामगिरीचे मूल्यमापन करतील. विजेत्यांना २५ जानेवारी २०२५ रोजी सरंक्षण राज्यमंत्री संजय सेठ यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान केले जातील.

प्रत्येक गटातील अव्वल तीन संघांना रोख पारितोषिक (प्रथम - रु. २१,०००/-, द्वितीय - रु. १६,०००/- आणि तृतीय - रु. ११,०००/-), चषक तसेच प्रमाणपत्रे दिली जातील. प्रत्येक गटातील उर्वरित संघाला प्रत्येकी ३,०००/- चे प्रोत्साहनपर रोख पारितोषिक दिले जाईल.

## दहावी-बारावी परीक्षेचे प्रवेशपत्र नव्याने ऑनलाईन उपलब्ध

दैनिक आपला विदर्भ

**नांदेड/प्रतिनिधी :** फेब्रुवारी-मार्चमध्ये घेण्यात येणाऱ्या इयत्ता बारावी परीक्षेचे प्रवेशपत्र (हॉलतिकीट) नव्याने २३ जानेवारी पासून तर इयत्ता दहावी परीक्षेचे प्रवेशपत्र २० जानेवारीपासून उपलब्ध करून देण्यात येत आहेत. याबाबत महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे यांच्याशी संलग्न असलेल्या सर्व उच्च माध्यमिक शाळेचे प्राचार्य-शिक्षक, विद्यार्थी, पालकांनी नोंद घ्यावी, असे आवाहन शिक्षण मंडळाचे सचिन देविदास कुलाळ यांनी केले आहे.

मंडळाने उपलब्ध करून दिलेल्या इयत्ता १२ वी प्रवेश पत्रांवर (हॉलतिकीट) जातीचा प्रवर्ग या कॉलमची छपाई करण्यात आली होती. याबाबत लोकभावनेचा आदर करून मंडळाने दिलगिरी व्यक्त केली आहे. प्रवेशपत्रांवरील (हॉल तिकीट) सदरचा जातीचा प्रवर्ग कॉलम रद्द केला असून विद्यार्थ्यांची परीक्षेविषयक इतर माहिती आहे तशीच राहणार आहे. नव्याने तयार केलेली प्रवेशपत्रे (हॉलतिकीट) गुरूवार २३ जानेवारी पासून ऑनलाईन पद्धतीने मंडळाच्या www.mahahsscboard.in यासंकेतस्थळावर Admit Card या लिंकद्वारे डाऊनलोड करता येणार आहेत.

तसेच माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इयत्ता दहावी) परीक्षा फेब्रुवारी-मार्च २०२५ साठी सर्व विभागीय मंडळातील विद्यार्थ्यांच्या प्रवेशपत्रावरील (हॉल तिकीट) जातीचा प्रवर्ग हा कॉलम रद्द करण्यात आला आहे. ही प्रवेशपत्र (हॉल तिकीट) ऑनलाईन पद्धतीने मंडळाच्या www.mahahsscboard.in या संकेतस्थळावर सोमवार २० जानेवारी रोजी दुपारी ३ वाजेपासून Admit Card या लिंकद्वारे डाऊनलोड करण्यासाठी उपलब्ध करून देण्यात आली आहेत.

डाऊनलोड संदर्भातील उर्वरित इतर सूचना व विद्यार्थ्यांची परीक्षाविषयक माहिती आहे तशीच कायम राहील. यात कोणताही बदल होणार नाही याची सर्व कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य, माध्यमिक शाळांचे मुख्याध्यापक, सर्व शिक्षक, विद्यार्थी-पालकांनी नोंद घ्यावी, असेही आवाहन शिक्षण मंडळाने प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे.

## स्तन व गर्भाशयमुख कर्करोग निदानासाठी तपासणी मोहीम राबवावी - आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यामध्ये स्तन व गर्भाशयमुख कर्करोगाचे प्रमाण जास्त असल्याचे निदर्शनास आले आहे. या दोन्ही कर्करोगाच्या निदानासाठी राज्यात मोहीम राबविण्यात यावी, असे निर्देश सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिले.

आर्थिक वर्ष २०२५ - २६ च्या नियोजनासाठी आरोग्य भवन येथे आयोजित बैठकीत आरोग्य मंत्री श्री. आबिटकर बोलत होते. बैठकीस सचिव वीरेंद्र सिंग, आरोग्य सेवा आयुक्त अमगोथू श्रीरंगा नायक, संचालक डॉ. नितीन अंबाडेकर, वैद्यकीय वस्तू खरेदी प्राधिकरणचे मुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रकांत डांगे, राज्य सेवा हमी सोसायटीचे मुख्य कार्यकारी अधिकारी अण्णासाहेब चव्हाण, सहसंचालक श्रीमती कमलापुरे आदींसह विविध शाखांचे अधिकारी उपस्थित होते.

आरोग्य मंडळाच्या ठिकाणी संदर्भ सेवा रुग्णालये उभारण्याबाबत पुढील वर्षात आर्थिक तरतुदीची मागणी करण्याबाबत सूचना देताना आरोग्य मंत्री श्री.अबिटकर म्हणाले, नाशिक व अमरावती येथील संदर्भ सेवा रुग्णालय कार्यान्वित झाली आहे. उर्वरित सर्व ठिकाणी रुग्णालयाच्या उभारणीसाठी जागा शोधून निधीची मागणी करण्यात यावी. मागील आर्थिक वर्ष २०२४ - २५ मध्ये मिळालेला संपूर्ण निधी खर्च करण्यात यावा. याबाबत विहित कालमर्यादा निश्रि्चत करण्यात यावी. क्षयरोग दुरीकरण कार्यक्रमांतर्गत मोठ्या प्रमाणावर जनजागृती करण्यात यावी. तसेच कुष्ठरोग रुग्ण शोध मोहीमही प्रभावीपणे राबविण्यात यावी.

जिल्हास्तरावर आरोग्य विभागाच्या योजनांची माहिती तसेच तक्रारीच्या अनुषंगाने संपर्क यंत्रणा निर्माण करण्यात यावी. यामध्ये प्रशिक्षित मनुष्यबळाची नियुक्ती करावी. या संपर्क यंत्रणेचे केंद्र मुंबईत असावे. महात्मा फुले जन आरोग्य अभियान अंतर्गत उपलब्ध खाटांची माहिती ऑनलाईन पद्धतीने मिळण्याची व्यवस्था करण्यात यावी, अशा सूचनाही यावेळी मंत्री सार्वजनिक आरोग्य मंत्री श्री. आबिटकर यांनी दिल्या.

## एकलव्य स्कूल प्रवेशासाठी २३ फेब्रुवारीला पूर्व परीक्षा

### राज्यात ३ हजार २६९ जागा; अर्जासाठी ५ फेब्रुवारी पर्यंत मुदत

दैनिक आपला विदर्भ

**नांदेड/प्रतिनिधी :** राष्ट्रीय आदिवासी छात्र शिक्षा समितीच्या मार्गदर्शक सूचनांनुसार सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षासाठी महाराष्ट्रातील एकलव्य मॉडेल रेसिडेंशियल स्कूलची प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येत आहे. त्याअंतर्गत येत्या २३ फेब्रुवारी २०२५ रोजी प्रवेश पूर्व परीक्षा घेण्यात येणार आहे. या परीक्षेद्वारे इयत्ता सहावीत २ हजार २२० नवीन तर इयत्ता सातवी ते नववीच्या १ हजार ४९ रिक्त जागांवर विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जाणार आहे. पात्र व इच्छुक विद्यार्थ्यांना ५ फेब्रुवारी २०२५ पर्यंत अर्ज करण्याची मुदत देण्यात आलेली आहे.

किनवट एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पांतर्गत या प्रवेश स्पर्धा परिक्षा किनवट तालुक्यातील शासकीय माध्यमिक व उच्च माध्यमिक (कन्या) आश्रमशाळा बोधडी व एकलव्य रेसिडेंशियल पब्लिक स्कुल सहस्त्रकुंड या परिक्षा केंद्रावर रविवार २३ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी ११ ते दुपारी २ या वेळेत घेण्यात येणार आहे. या स्पर्धा परिक्षेसाठी विहीत नमुन्यातील प्रवेश अर्ज किनवट प्रकल्प कार्यालय व कार्यालया अंतर्गत येणाऱ्या सर्व शासकीय, अनुदानीत आश्रमशाळा व एकलव्य रेसिडेंशियल पब्लिक स्कुल सहस्त्रकुंड येथे विनामुल्य प्रवेश अर्ज उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत. जास्तीत जास्त इच्छुक व पात्र अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यानी निर्धारीत मुदतीत अर्ज सादर करावेत, असे आवाहन एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पाच्या प्रकल्प अधिकारी तथा सहायक जिल्हाधिकारी श्रीमती मेघना कावली यांनी केले आहे.

दुर्गम आदिवासी भागातील मुलांना शैक्षणिक प्रवाहात आणण्यासाठी नाशिक, ठाणे, अमरावती, नागपुर या चार अपरआयुक्त कार्यक्षेत्रांमध्ये महाराष्ट्र ट्रायबल पब्लिक स्कुल सोसायटी (नाशिक) मार्फत सीबीएसई बोर्डाच्या ३७ एकलव्य निवासी शाळा चालविल्या जातात. याठिकाणी विद्यार्थ्यांना मोफत शिक्षण, निवास, भोजन, गणवेश आदी सुविधा उपलब्ध करून दिले जातात. सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षासाठी इयत्ता सातवी, आठवी, नववीसाठी रिक्त जागांचा अनुशेष भरण्यात येणार आहे. तर प्रत्येक एकलव्य स्कूलमध्ये इयत्ता सहावीसाठी ३० मुले व ३० मुली अशी ६० प्रवेश क्षमता असणार आहे. या सर्व जागांवर प्रवेश पूर्वपरीक्षेद्वारे विद्यार्थ्यांची निश्रि्चती केली जाणार आहे.

दरम्यान, एकलव्य मॉडेल रेसिडेंशियल स्कूलच्या इयत्ता सहावीच्या २ हजार २२० जागांवर विद्यार्थ्यांना प्रथम प्रवेश हे पूर्वपरीक्षेच्या माध्यमातून दिला जाणार आहे. त्यात मुलांच्या १ हजार ११० तर मुलींच्या १ हजार ११० जागांचा समावेश आहे. इयत्ता सातवीच्या ५३३, आठवीच्या २९८ तर नववीच्या २१८ रिक्त जागा प्रवेश पूर्वपरीक्षेद्वारे भरण्यात येणार आहे. तब्बल १ हजार ६०९ मुलांना तर १ हजार ६६० मुलींना एकलव्य स्कुलमध्ये प्रवेश मिळणार आहे.

राज्यातील ३७ एकलव्य मॉडेल रेसिडेंशियल स्कूलच्या ३ हजार २६९ जागांवर अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना पूर्वपरीक्षेद्वारे प्रवेश देण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांची निवड गुणानुक्रमे व त्यांच्या प्राधान्यक्रमानुसार होणार आहे. त्यामुळे जास्तीतजास्त पात्र व इच्छुक विद्यार्थ्यांनी निर्धारित मुदतीत अर्ज करावेत. विभाग निहाय उपलब्ध जागा नाशिक १२५७, नागपुर १०२०, ठाणे ६१३, अमरावती ३७९ याप्रमाणे आहेत, असेही प्रसिद्धी पत्रकात स्पष्ट केले आहे.

## छत्तीसगड, ओडिशाच्या सीमावर्ती भागात नक्षलवाद्यांशी चकमक; १६ नक्षलवाद्यांना ठार करण्यात यश

रायपूर : छत्तीसगडच्या जंगलात सुरक्षा दलाचे जवान आणि नक्षलवाद्यांमध्ये जोरदार चकमक झाली. या चकमकीत तब्बल १६ नक्षलवादी ठार करण्यात जवानांना यश आलं. घटनास्थळावरुन मोठ्या प्रमाणात शस्त्रं आणि दारूगोळा जप्त करण्यात आला आहे. घटनास्थळावर अद्यापही नक्षलवाद्यांची शोधमोहीम सुरू आहे. ओडिशा पोलीस मुख्यालयाकडून या कारवाईबाबत माहिती जारी करण्यात आली आहे. विशेष म्हणजे ही कारवाई ओडिशातील नुआपाडा आणि छत्तीगडमधील गरियाबंद जिल्ह्यात छत्तीसगड पोलीस आणि केंद्रीय राखीव पोलीस दलाच्या जवानांकडून राबवण्यात येत आहे.

नक्षलवादी आणि सुरक्षा दलांच्या जवानांमध्ये चकमक : छत्तीसगडमधील गरियाबंद जिल्ह्यात रविवारपासून सुरक्षा दलाचे जवान आणि नक्षलवाद्यांमध्ये चकमक सुरू आहे. सोमवारी रात्री उशिरा सुरक्षा दल आणि नक्षलवाद्यांमध्ये पुन्हा चकमक झाली. या चकमकीत तब्बल १६ नक्षलवादी ठार करण्यात सुरक्षा दलाच्या जवानांना यश आलं. ओडिशा पोलीस मुख्यालयाकडून ही माहिती देण्यात आली आहे. घटनास्तळावरुन जवानांनी मोठ्या प्रमाणात शस्त्रं आणि दारूगोळा जप्त केला आहे. घटनास्थळी अद्यापही शोध मोहीम राबवण्यात येत आहे.

# नाशिक शहरात चरस विक्री करणारा गुन्हेगार मुंबई नाका पोलिसांच्या ताब्यात

दैनिक आपला विदर्भ

**नाशिक/प्रतिनिधी :** नाशिक ठाणे जिल्ह्यातून अमली पदार्थाची विक्री करण्यासाठी आलेल्या इसमाला द्वारका परिसरात रात्री मुंबई नाका पोलिसांनी सलमान फालके याला ताब्यात घेतले आहे. सलमानची अंग झडती घेतली असता त्याच्याकडून ४९ ग्राम चरस मुंबई नाका पोलिसांना मिळून आली. पोलिसांनी सलमानची कसून चौकशी केली असता त्यांनी चरस मुंब्रा येथून नाशिकला विकण्यासाठी आणले होते विशेष बाब म्हणजे काही दिवसांपूर्वी सलमानला इंफिरनागर पोलिसांनी अमली पदार्थ विक्रीच्या गुन्ह्यांमध्ये अटक केली होती. त्यानंतर तो जामीनावर बाहेर आला होता त्याला न्यायालयाने जमीन देतांना दर महिन्यातून दोनदा इंदिरानगर पोलीस ठाण्यात हजेरी लावली होती मात्र सलमानने नामी शकल लढवली पोलीस ठाण्यात आजारी लावण्याआधी तो अमली पदार्थाची तस्करी करत होता मात्र सलमान हा विसरून गेला होता की गुन्हेगार कितीही शातिर असला तरी तो पोलिसांच्या नजरेतून सुटू शकत नाही आणि सलमानच्या बाबतीत देखील हाच प्रकार घडला.सलमान ला मुंबई नाका पोलिसांनी अटक करून सलमान नाशिकला कोणाला चरस विकण्यासाठी आलं होतं याचा तपास पोलीस करत आहे.



## विविध वृत्त...

### रविवारचा आठवडी बाजार रद्द; जिल्हाधिकाऱ्यांचे आदेश

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** जिल्हाधिकारी कार्यालय व पोलीस कवायत मैदान येथे मुख्य शासकीय ध्वजारोहन सोहळा दि. २६ जानेवारी २०२५ रोजी साजरा करण्यात येणार आहे. या दिवशी विविध शाळांची प्रभातफेरी व सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात येतात. तसेच कार्यक्रमासाठी स्त्री, पुरुष व लहान मुलांचा जमाव असतो. रविवार (दि.२६ जानेवारी) हा आठवडी बाजाराचा दिवस असल्याने बुलढाणा शहराच्या मुख्य मार्गावर, रस्त्यावर आठवडी बाजार भरत असतो. त्यामुळे या ठिकाणी गर्दी निर्माण होऊन रहदारीस अडथळा निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्याअनुषंगाने बाजार आणि यात्रा कायदा १८६२ च्या कलम ५ अन्वये कायदा व सुव्यवस्था तसेच वाहतुकीस अडचण निर्माण होणार नाही या दृष्टीकोणातून बुलढाणा शहरामध्ये रविवार दि. २६ जानेवारी रोजी भरविण्यात येणारा आठवडी बाजार रद्द करण्यात येत असून आठवडी बाजार पुढील दिवशी भरण्यात यावा, असे आदेश जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी निर्गमित केले आहे.

### मोताळा शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था येथे जिल्हास्तरीय खो-खो स्पर्धा

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** क्रीडा महोत्सवांतर्गत शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, मोताळा येथे दि. २२ व २३ जानेवारी रोजी जिल्हास्तरीय भव्य खो-खो स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. सदर स्पर्धा संस्थेच्या मैदानावर होणार असून जिल्ह्यातील सर्व शासकीय व अशासकीय, आयटीआय येथील मुले सहभागी होणार आहे. स्पर्धा यशस्वीपणे पार पाडण्यासाठी संस्थेचे प्राचार्य एस.डी. गंगावणे व सर्व कर्मचारी परिश्रम घेत आहेत.

### जिल्हा क्षयरोग केंद्राच्यावतीने युवा दिन उत्साहात संपन्न



दैनिक आपला विदर्भ

**नांदेड/प्रतिनिधी :** राज्य शासनाचा सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रमात सध्या १०० दिवसीय टीबी मुक्त भारत अभियान राबविण्यात येत आहे. हा कार्यक्रम ७ डिसेंबर पासू सुरू झाला असून तो २४ मार्च पर्यंत राबविण्यात येत आहे. या अभियानाचा जास्तीतजास्त संशयित क्षयरुग्णांची तपासणी करून क्षयरुग्णांना उपचारावर आणून क्षयमुक्त करणे हा मुख्य उद्देश आहे.

या अभियानाबाबत जनजागृती करण्याच्या उद्देशाने विविध स्पर्धा जिल्हा क्षयरोग केंद्र नांदेडतर्फे राष्ट्रीय युवा दिनानिमित्ताचे औचित्य साधून घेण्यात आल्या. या स्पर्धेतील विजेत्यांना सन्मानचिन्ह प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले. याप्रसंगी जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. निळकंठ भोसीकर, सहाय्यक जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. पेरके, जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. सतीश कोपुरवाड, आर.एम. ओ. डॉ. बुट्टे, वैद्यकीय अधिकारी डॉ.मिरदुडे, डॉ.अमृत चव्हाण, श्री गुरुगोविंदसिंगजी शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील नर्सिंग कॉलेजच्या प्राचार्य श्रीमती बोथीकर आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी विविध स्पर्धेतील विजेत्यांना मानचिन्ह प्रशस्तीपत्र तसेच स्पर्धेत सहभागी झालेल्यांना सहभागाबाबतचे प्रमाणपत्र प्रदान केले. याप्रसंगी वरील मान्यवरांची मार्गदर्शनपर भाषणे संपन्न झाली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अनिरुद्ध भावसार तर आभार जितेंद्र दवणे यांनी मानले.

### निवृत्तीवेतनधारकांसाठी सोमवारी पेन्शन अदालत

दैनिक आपला विदर्भ

**नांदेड/प्रतिनिधी :** महालेखापाल यांच्या अधिनस्त अधिकारी-कर्मचाऱ्यांच्याद्वारे निवृत्तीवेतनधारकासाठी व निवृत्तीवेतनविषयक एजी कार्यालयात होणाऱ्या अडचणीचे निराकरण करण्यात येणार आहे. यादृष्टिने पेन्शन अदालतीचे आयोजन सोमवार २७ जानेवारी २०२५ रोजी नियोजन भवन नांदेड येथे करण्यात आले आहे.

कार्यालयातील लेखा विषयक कामकाज करणारे कर्मचारी-सेवानिवृत्तीवेतनधारकांनी आपल्यास्तरावर अवगत करावे, असे आवाहन जिल्हा कोषागार अधिकारी नांदेड यांनी केले आहे.

### युवा प्रशिक्षण योजनेमधून ५० हजार युवांना प्रशिक्षण देण्यात येणार, मंत्री मंगलप्रभात लोढा यांची माहिती

**मुंबई/प्रतिनिधी :** महायुती सरकारने विधानसभा निवडणुकीपूर्वी अनेक महत्त्वपूर्ण योजनांची घोषणा केली होती. यात मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण या योजनेचा देखील समावेश होता. या योजनेच्या माध्यमातून तरुणांना प्रशिक्षण तसेच रोजगारासाठी प्रोत्साहित करण्यात येणार असल्याचं सरकारनं म्हटलं होतं.

दरम्यान, आता राज्य सरकारने जागतिक बँकेसोबत २३ कोटी रुपयांचा करार केला असून, कौशल्य विकास विभागाच्या मार्फत प्रभावीपणे योजना राबवणार असून, मुंबई, पुणे, नाशिक, अमरावती, छत्रपती संभाजीनगर आदी जिल्ह्यांसह राज्यभर मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेमधून १०० दिवसांत ५० हजार युवक आणि युवतींना प्रशिक्षण देणार असल्याचं कौशल्य विकासमंत्री मंगल प्रभात लोढा यांनी सांगितलंय.

# देश आणि समाज सक्षम करण्यासाठी शिक्षणाची भुमिका महत्वाची : केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव











दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी** :देश आणि समाज सक्षम करण्यासाठी शिक्षणाची भुमिका महत्वाचे असून शिक्षणाचे धडे देणाऱ्या शिक्षकांच ही कार्य महत्वपुर्ण आहे असे प्रतिपादन केंद्रीय मंत्री केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांनी केले

बेंगळुरू येथील श्री श्री रविशंकर विद्या मानववीर ट्रस्टने आयोजित केलेल्या श्री श्री एज्युकेशन अवॉर्ड्स २०२५ चे केंद्रीय आयुष (स्वतंत्र प्रभार) केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांच्या हस्ते झाले त्यावेळी मार्गदर्शन करतांना ते बोलत होते.

यावेळी व्यासपीठावर आर्ट ऑफ लिव्हिंगचे संस्थापक श्री श्री रविशंकरजी उपस्थित होते मंत्री महोदय पुढे म्हणाले की पुरस्कार हे शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित करते पुरस्कारप्राप्त व्यक्तीनी समाजात सकारात्मक बदल घडवून आणण्यासाठी प्रयत्न करावे असे त्यांनी आवाहन केले देश का प्रकृती अभियान देशात २६ नोव्हेंबर २०२४ ते २५ डिसेंबर २०२४ पर्यंत चांगल्यारितीने राबविल्या गेले या अभियानात तंत्रज्ञानाचा वापर करून व्यक्तींना त्यांच्या प्रकृती संदर्भाची माहिती देण्याचं काम देशभर केल्या जात आहे . श्री श्री रविशंकर यांचा आर्ट ऑफ लिव्हिंग परिवारने संपूर्ण देशभर लोकांमध्ये जनजागृती व सकारात्मकता आणण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावीत आहे आर्ट ऑफ लिव्हिंग ही संस्था जागतिक दर्जाची आहे. तणावमुक्त आणि मूल्यावर आधारित शिक्षण देत असल्या बद्दल संस्थेचे कौतुक केले. शिक्षण हा समाजाच्या सर्वांगीण विकासाचा आधार असल्याचे सांगून विद्यार्थ्यांच्या शारीरिक, मानसिक आणि नैतिक विकासावर भर दिला पाहिजे अस मत ही त्यांनी व्यक्त केले आणि पुरस्कार प्राप्त व्यक्तींचे अभिनंदन केले.

## शहरात झालेल्या घरफोडीचा गुन्हा उघडकीस; देवपूर पोलिसांची कामगिरी



**धुळे/प्रतिनिधी :** धुळे शहरातील देवपूरातील प्रभात नगर येथे अज्ञात चोरट्यांनी घराचा लोखंडी दरवाजा चौकीटीसह बाहेर काढुन लाकडी दरवाज्याचे कडी कोंडा तोडुन घरातील गोरदरेज कपाटातील ठेवलेले सोन्याच चांदीचे दागिने व रोक रक्कम असे एकुण ३१ हजार रुपये किमतीचा ऐवज चोरुन नेला होता. त्यानुसार फिर्याद डॉ. विजयकुमार रामचंद्र कुलकर्णी राहणार एकता नगर प्लॉट क्र. १०० यांनी तक्रारी दाखल केली होती. सदर गुन्हा दाखल होताच पोलिसांनी तपासाची चक्र फिरवत सीसीटीव्ही च्या आधारे चोरट्यांना जेरबंद केले आहे.

गेल्या अनेक दिवसांपासून धुळे शहरातील देवपूर भागामध्ये मोठ्या प्रमाणामध्ये चोरीचे प्रमाण वाढले आहे. वाढत्या चोरीमुळे परिसरातील नागरिकांमध्ये दहशतिचे वातावरण निर्माण झाले आहे. सदर चोरट्यांचा बंदोबस्त करावा अशी मागणी परिसरातील नागरिक करीत होती. डॉक्टर विजयकुमार कुलकर्णी यांच्या घरी झालेल्या चोरीचे सीसीटीव्ही फुटेज पोलिसांच्या हाती लागले व पोलिसांनी आपले तपासाची चक्र फिरवत संबंधित चोरट्याला गजाआड केले असून नागरिकांमधून पोलिसांनी केलेल्या कारवाईचे समाधान व्यक्त होत आहे.

## मिनी ट्रॅक्टर व उपसाधने पुरवठा योजना

दैनिक आपला विदर्भ

**नांदेड/प्रतिनिधी :** अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांच्या स्वयंसहाय्यता बचतगटांना मिनी ट्रॅक्टर व त्याची उपसाधने यांचा पुरवठा करण्याची योजना राबविण्यात येत आहे. जिल्ह्यातील इच्छूक पात्र बचतगटांनी ऑनलाईन अर्ज http://mini.mahasamajkalyan.in या संकेत स्थळावर भरुन त्याची सत्यप्रत १० फेब्रुवारी २०२५ पर्यंत समाज कल्याण सहायक आयुक्त नांदेड या कार्यालयात सादर करावी, असे आवाहन समाज कल्याण सहायक आयुक्त शिवानंद मिनगिरे यांनी केले आहे. या योजनेच्या मार्गदर्शक सूचना शासन निर्णयान्वये ८ मार्च २०१७ रोजी निश्रि्चत करण्यात आल्या आहेत. हा शासन निर्णय शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर निरीक्षणासाठी उपलब्ध आहे.

## फखरोद्दीन अली अहमद उर्दू हाइस्कूल जिल्हास्तरावर





दैनिक आपला विदर्भ

**डोणगाव/प्रतिनिधी :** दि.०९ व १० जानेवरी २०२५ रोजी या दोन दिवसीय जिजाऊ ऑफ स्कॉलर अँड गूंजकर कॉमर्स व साइंस आवार ता.खामगाव जि. बुलडाणा येथे,५२वे जिल्हा स्तरीय विज्ञान प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते या जिल्हा विज्ञान प्रदर्शन मध्ये फखरोद्दीनन अली अहमद उर्दु हाइस्कूल मधून यांचा तालुका स्तरावर प्रथम क्रमांक आल्या मुळे ते जिल्हा स्तरावर पात्र झाले होते या ठिकाणी असलम खान यानी आपल्या प्रयोगाची रीतसर मांडणी करून आपले मॉडेलचे उत्तम प्रकारे आपले प्रयोग प्रदर्शित केले असून तेथे पन सुद्धा त्यांचा प्रयोगाला मा.शिक्षक आमदार सरनाईक साहेब यानी सुद्धा भेट देऊन प्रयोगाची पहनी केली असून प्रयोगाची तोंड भरून स्तुति केली तेथेपन सुद्धा असलम खान यांचा स्वनिर्मिति शैक्षणिक सहित्याची दखल घेत त्यांच्या मॉडेलची स्तुति झाली असून असलम खान यांना महाराष्ट्र राज्य शैक्षणिक प्रयोगशाळा कर्मचारी सहभागी झालेले सर्व प्रयोगशाळा कर्मचारी यांना प्रयोगशाळा कर्मचारी संघटना बुलढाणा यांचा तर्फे मा. अनिल आकाळ शिक्षणाधिकारी साहेब (माध्य जि. प. बुलडाणा) जगन मुंढे साहेब (सहा. शिक्षण उपनिरीक्षक तथा विज्ञान पर्यवेक्षक जि. प. बुलडाणा) संजय जारे साहेब(अध्यक्ष बुलडाणा जिल्हा विज्ञान शिक्षक संघटना) बाळासाहेब खरात (शिक्षणाधिकारी प्राथ. जि. प. बुलढाणा व गूंजकर साहेब व गूंजकर मैडम व शाळेचे प्राचार्य या सर्व मान्यवरांचे हस्ते असलम खान यांना शील्ड व प्रमाणपत्र देऊन सम्मान करण्यात आला।

## गुगलवरुन बँकेचा हेल्पलाईन नंबर शोधणं महिला डॉक्टरला पडले महागात; सायबर चोरट्याकडून १४ लाखांची फसवणूक


दैनिक आपला विदर्भ

**नागपूर/प्रतिनिधी :** नागपुरातील बेलतरोडी पोलीस स्टेशन हद्दीतील महिला डॉक्टरची सायबर गुन्हेगारांकडून १४ लाखांची फसवणूक करण्यात आली आहे. यामध्ये इंटरनेट वरून स्टेट बँक ऑफ इंडियाचा कस्टमर केअर क्रमांक शोधने या महिलेला चांगलेच महागात पडले आहे. महिला डॉक्टर चिचभवन परिसरातील स्टेट ऑफ इंडियाच्या शाखेत गेली होती तिला तिच्या बँक खात्यातील आठ लाख रुपये फिक्स्ड डिपॉझिट करायचे होते. परंतु त्या बँकेत गेल्यावर योनो पेॲप द्वारे सिस्टीम पद्धतीने स्टेटस तपासू शकता असे सांगण्यात आले. त्यानंतर त्या घरी आल्या त्यांनी ते तपासण्याचा प्रयत्न केला पण ते त्यांना करता आले नाही म्हणून त्यांनी गुगलवर एसबीआय हेल्पलाईन मिहानचा शोध घेतला, परंतु त्यांना तो नंबर बंद असल्याने त्यांनी जस्ट डायल सिस्टम मधून नंबर शोधण्याचा प्रयत्न केला आणि त्यामध्ये त्यांना एक नंबर मिळाला.

या नंबरवर फोन केल्यानंतर समोरील व्यक्तीने आपले नाव राकेश पटले असे सांगितले आणि एसबीआय मिहान शाखेतून बोलत आहे असे सांगत महिला डॉक्टरच्या व्हाट्सप वर एक एपीके फाईल पाठवली आणि त्यानंतर त्यांनी ती फाईल ओपन केली तर त्यांचा संपूर्ण मोबाईल हॅक झाला. त्यांच्या बँक खात्यातील १० लाख ९० हजार रुपये सायबर गुन्हेगाराने गायब केले तर एफडी अकाउंट वरून २ लाख ८० हजारांचे कर्जही घेतले. या महिला डॉक्टरने जेव्हा अकाउंट मध्ये पैसे तपासले तर ० बॅलन्स दाखवले, त्यांनी बँकेत जाऊन विचारणा केली असता हा प्रकार उघडकीस आला आहे. या नंतर बेलतरोडी पोलीस स्टेशनला अज्ञात आरोपीच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## लाखो भाविकांच्या उपस्थितीत हिवराआश्रम येथे पार पडली महापंगत

दैनिक आपला विदर्भ







**बुलडाणा/प्रतिनिधी :** बुलढाण्याच्या हिवरा आश्रम येथे स्वामी विवेकानंद यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी केली जाते. तीन दिवस उत्सव साजरा करून आज एकाच महापंगतीत १५१ क्विंटल गव्हाची पुरी आणि १०१ क्विंटल वांग्याची भाजी अशा महाप्रसादाचे वितरण केले गेले. या एकाच महापंगतीमध्ये जवळपास दोन ते अडीच लाख भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. हिवरा आश्रम येथे ही महाप्रसादाची पंगत झाली. बुलढाणा जिल्ह्याच्या मेहकर तालुक्यातील स्व. शुकदास महाराज यांच्या हिवरा आश्रम येथे विवेकानंद आश्रमात सालबादाप्रमाणे विवेकानंद जन्मोत्सव निमित्त भव्य महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये १५१ क्विंटल पुरी, १०१ क्विंटल भाजीच्या प्रसादाच्या महापंगतीने उत्सवाची सांगता झाली आहे. जवळपास २ लाख भाविक एकाच वेळी एकसाथ बसून जेवण करतात. १९६५ पासून हिवरा आश्रम येथे ही प्रथा सुरु आहे. समाजातील जातीभेद मिटावे म्हणून स्व. शुकदास महाराज यांनी ही प्रथा इथे सुरू केली होती. स्वामी विवेकानंद यांची १६२ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी केली जात आहे.